महाराष्ट्र शासनाचा २००६-२००७ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी मंगळवार, दिनांक २१ मार्च २००६ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

**सुधारित अंदाज २००५-०६.** १. मार्च २००५ मध्ये सन २००५-०६ चा अर्थसंकल्प सादर करताना रु. ४०.१६ कोटींची शिल्लक राहील असा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजात रु ३८७४.४० कोटींची शिल्लक दिसते. वर्षारंभाची रु.१९४.४१ कोटींची प्रत्यक्ष उणे शिल्लक हिशेबात घेतल्यास वर्ष अखेरची शिल्लक रु. ३६७९.९९ कोटी इतकी राहील.

**अर्थसंकल्पीय अंदाज २००६-०७.** २. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये पुढे दर्शविल्याप्रमाणे रु. ८४७९.०४ कोटींची शिल्लक राहील असा अंदाज आहे :—

(रुपये कोटीत)

| | | |
|---|---|---|
| (अ) महसुली विभाग— | | |
| जमा | .. .. | ५९,१४५.८८ |
| खर्च | .. .. | ५८,८४०.०३ |
| | शिल्लक .. | ३०५.८५ |
| (ब) भांडवली विभाग— | | |
| जमा | .. .. | १३,२२९.९८ |
| खर्च | .. .. | १४,१३४.०३ |
| | तूट .. | ९०४.०५ |
| (क) लोकलेखा (निव्वळ) | शिल्लक.. | ७,४४८.८३ |
| (ड) एकूण | | |
| जमा (अ + ब + क) | .. | ७९,८२४.७० |
| खर्च (अ + ब) आणि अर्थसंकल्पात समाविष्ट न झालेला रु. २०५१.५८ कोटींचा योजनांतर्गत नियतव्यय | .. | ७५,०२५.६५ |
| | शिल्लक .. | ४,७९९.०५ |
| | सुरूवातीची शिल्लक .. | ३,६७९.९९ |
| | एकूण शिल्लक .. | ८,४७९.०४ |

वार्षिक योजना सन २००६-२००७ बाबत योजना आयोगाशी झालेल्या चर्चेच्या आधारे या वर्षाच्या योजनेचे आकारमान रु.१४,८२९ कोटी निश्चित करण्यात आले आहे. रु.१४,८२९ कोटी नियतव्ययापैकी रु. १२,७७७.४२ कोटी इतका नियतव्यय अर्थसंकल्पित झाला असून, उर्वरित रु. २,०५१.५८ कोटी इतक्या योजनांतर्गत नियतव्ययाची आवश्यक ती साधनसंपत्ती अर्थसंकल्पात उपलब्ध असल्याने हा नियतव्यय वर्षभरात अर्थसंकल्पित करण्यात येईल.

**करविषयक धोरण.**

३. चांगल्या कर विषयक धोरणांची सुरुवात कराचा पाया विस्तृत करण्यापासून होते. दुसरे म्हणजे आपले कराचे दर शेजारच्या राज्यातील कराच्या दरांशी सुसंगत असेच असले पाहिजेत. तिसरे म्हणजे कर विषयक धोरणातील बदल हे नेहमी सुधारणेच्या दिशेनेच असले पाहिजेत. माझे कर विषयक प्रस्ताव तयार करताना ही तत्वे मी मनाशी ठेवली आहेत.

**मूल्य वर्धित कर.**

४. सन्माननीय सभासदांना माहित आहे की, एप्रिल २००५ पासून इतर २० राज्यांसह महाराष्ट्राने देखिल प्रचलित विक्रीकर प्रणालीऐवजी मुल्यवर्धित कर पद्धतीची अंमलबजावणी चालू केली. येत्या काही दिवसात आपल्या शेजारची इतर राज्ये देखिल नवीन पद्धत अंगिकारणार आहेत. केंद्रीय विक्रीकर अधिनियमात महत्वाचे बदल करण्यासाठी सध्या चर्चा चालू आहे. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडताना सांगितले आहे की, एप्रिल २०१० पासून सर्व देशात वस्तू आणि सेवा ह्यांच्यावर एक एकात्म कर आकारण्यात येईल. भारतातील कर व्यवस्थेत निश्चितच मूलगामी फरक होत आहेत.

**कर पध्दतीत सुधारणा.**

५. नवीन कर पद्धतीची अंमलबजावणी आपण व्यवस्थितपणे चालू केली आहे आणि ही प्रणाली आता स्थिरावली आहे. करविषयक कार्यपद्धती अधिक सुलभ व सुटसुटीत करण्याचे काम

चालू आहे. विक्रीकर विभागाची पुनर्रचना आणि संगणकीकरण याचे काम देखिल चालू झाले आहे. ही सर्व कामे या वित्तीय वर्षाअखेर संपतील.

**सीमेवरील पहाणी.** ६. करचुकवेगिरीला आळा घालण्यासाठी राज्यात येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या मालाची पाहणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी मूल्यवर्धित कर अधिनियमात तजवीज देखील केली आहे. येत्या वर्षात राज्याच्या सीमा तसेच प्रमुख बंदरे आणि विमानतळ येथून होणाऱ्या माल वाहतुकीच्या पाहणीसाठी वेगळी पथके स्थापन करण्यात येतील. यामुळे विक्रीकराच्या उत्पन्नात भर पडेल यात मला शंका नाही.

**महसुलावर परिणाम.** ७. नवीन कर प्रणालीत वेळच्या वेळी विवरणपत्रे दाखल करुन घेणे, वसुली करणे व परतावा देणे या गोष्टी विशेष महत्वाच्या आहेत. यासंबंधीची थोडी आकडेवारी उद्बोधक ठरेल. मागच्या वर्षी मुंबई विक्रीकर अधिनियम व मोटार स्पिरीट अधिनियमाखालील करांची एकंदर वसुली १६६६४ कोटी रुपये इतकी होती. चालू वर्षी फेब्रुवारी २००६ अखेर एकत्र वसुली १६९५३ कोटी रुपये इतकी आहे. मागील वर्षी एकूण २७१ कोटी रुपयांचे परतावे दिले होते. यावर्षी फेब्रुवारी अखेरपर्यन्त ७७२ कोटी रुपयांचे परतावे दिले आहेत. नवीन करप्रणालीमध्ये महाराष्ट्रातील विक्रीकराचे दर एकंदरीत कमी झाले आहेत. त्यामुळे आधीच्या वर्षाच्या बरोबरीने महसुलात वाढ होणे शक्य नाही. त्यामुळे पहिल्या तीन वर्षांसाठी महसूल नुकसानीपोटी अनुक्रमे १०० टक्के, ७५ टक्के व ५० टक्के भरपाई देण्याचे केंद्र शासनाने मान्य केले आहे. चालू वर्षासाठी सुमारे १५०० कोटी रुपयांची भरपाई केंद्र शासनाकडून मिळेल अशी आमची अपेक्षा आहे. संगणकीकरणाद्वारे काम चालू झाले व राज्याच्या सीमांवरून येणाऱ्या जाणाऱ्या माल वाहतुकीची

पाहणी चालू झाली की येत्या दोन वर्षात आपल्याला पूर्वीचा महसुलवाढीचा वेग गाठता येईल.

**करांचे दर.** ८. मूल्यवर्धित करप्रणाली चालू होण्याच्या वेळी काही वस्तूंवर कराच्या बाबतीत सवलत किंवा माफी दिली होती. नवीन प्रणाली अजून पूर्णपणे स्थिरावली नाही. त्यामुळे राज्यांच्या वित्त मंत्र्यांच्या शक्ती प्रदत्त समितीने अलीकडे केंद्र शासनाला विनंती केली आहे की सध्याची सवलत आणि माफी अजून सहा महिन्याकरिता चालू ठेवावी. मात्र तेवढ्यासाठी राज्यांना मिळणारी महसुली नुकसान भरपाई कमी करू नये. केंद्र शासनाचा जो प्रतिसाद मिळेल त्यानुसार आवश्यक तो निर्णय पुढील काही दिवसात करण्यात येईल.

**अलीकडच्या घडामोडी.** ९. मूल्यवर्धित करप्रणालीची अंमलबजावणी सुरू होते वेळी विक्रीकर विभागाने इंटरनेटवर एक नवीन संकेतस्थळ विकसित केले. राज्यातील करदात्यांना त्याचा चांगला उपयोग होत आहे. दरमहा अंदाजे एक लाख करदाते या संकेतस्थळाला भेट देतात. केंद्रीय विक्रीकराचे नमूने मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आता उपलब्ध आहे. विवरणपत्रे देखील ऑनलाईन भरता यावीत यासाठी मी प्रयत्नशील आहे.

संगणकीकरणाचा एक भाग म्हणून प्रत्येक करदात्याला एक ओळख क्रमांक द्यायचा आहे. त्यासाठी डिसेंबर २००५ मध्ये सर्व करदात्यांकडून अर्ज घेतले होते. अर्जाची किंमत १०० रुपये होती आणि जमा झालेल्या रकमांमधून विक्रीकर विभागाच्या इतिहासात पहिल्यांदाच करविषयक मार्गदर्शिका करदात्यांना देण्यात येईल.

**व्यवसाय कर.** १०. व्यवसाय कर लावण्यासाठी जी अनुसूची वापरली जाते त्यात महत्वाचे बदल करण्याचे मी ठरविले आहे. सध्या मासिक पगार २००० रुपये असणाऱ्या पगारदारांना व्यवसाय कर भरावा लागतो. आता ही मर्यादा २५०० रुपयांपर्यंत वाढविण्याचे मी ठरविले आहे. यामुळे एका मोठ्या वर्गाला करातून सुटका मिळणार आहे.

**लॉटरीवरील कर.** **११.** मुंबई विक्रीकर अधिनियमामध्ये लॉटरीच्या विक्रीवर कर लावण्याची तजवीज होती. मात्र राष्ट्रीय सहमतीप्रमाणे नवीन विक्रीकर अधिनियमाखाली हा कर लावता येत नाही. ह्या व्यवहारावर कर लावण्यासाठी एक नवीन विधेयक तयार करून ते सभागृहापुढे सादर करण्यात येईल. तरूणांच्यातील लॉटरीचे व्यसन कमी करणे जरूरीचे आहे. लॉटरीच्या वारंवार सोडती काढण्याची प्रवृत्ती नाहीशी करणे आवश्यक आहे. त्यासाठी लॉटरीच्या सोडतीवर जास्त दराने कर लावण्याचा माझा विचार आहे.

**मुद्रांक शुल्क.** **१२.** शासनाच्या महसुलात मुद्रांक शुल्काचा वाटा लक्षणीय आहे. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारांसाठी मुद्रांक शुल्काचा कमाल दर यापूर्वीच १० टक्क्यांवरून कमी करून ५ टक्के केला आहे. मुद्रांक शुल्क व नोंदणी फी यांच्या वसुलीत मागील वर्षापेक्षा जवळपास २३ टक्के वाढ आहे. चालू वर्षाची वसुली सुमारे ५,००० कोटी रुपये इतकी होईल. मुद्रांक शुल्काचे दर कमी असावे हे माझे धोरणच आहे.

**घर खरेदीवर मुद्रांक शुल्कात सवलत.** **१३.** स्वतःचे घर असावे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. साध्यातील साध्या नागरिकाचे देखिल तेच स्वप्न असते. मी आता प्रस्तावित करतो की, सहकारी गृहनिर्माण संस्थांतील भुखंड किंवा सदनिका यांवर पहिल्या अडीच लाख रुपयापर्यंत ०.५ टक्के ऐवजी रु.१०० इतकेच नाममात्र मुद्रांक शुल्क आकारावे

**गहाणखतावर मुद्रांक शुल्कात सवलत.** **१४.** घरबांधणी उद्योग, औद्योगिक क्षेत्र, व्यापार आणि बँकींग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सर्व प्रकारच्या गहाणखतांवरील मुद्रांक शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देऊन गेल्या वर्षी शुल्काचा दर १ टक्क्यावरून कमी करून अर्धा टक्का केला होता. याच उद्देशाने हक्क निक्षेप लेख (Deposit of Title Deeds) व जंगम मालमत्तेचे तारणगहाण व हडपतारण यासाठी जी गहाणखते होतात

त्यावरील मुद्रांक शुल्क ०.५ टक्क्यांवरून कमी करून ०.१ टक्का करायचे मी ठरविले आहे. शिवाय विनातारण कर्जाच्या करारावर मुद्रांक शुल्क आकारणी करण्याची तरतूद अधिनियमात आहे. त्यावरील दर ०.२५ टक्क्यावरून कमी करून ०.१ टक्का करण्याचे मी ठरविले आहे.

**गहाणखताच्या नोंदणीकरिता सवलत.** १५. कर्ज देणाऱ्या बँका आणि नागरिक या दोघांचे कायदेशीर हक्क सुरक्षित राहिले पाहिजेत. यासाठी हक्क निक्षेप लेख दस्तांची नोंदणी करण्याची व्यवस्था केली जाणार आहे. सध्या १ टक्का दराने नोंदणी फी भरावी लागते. त्याऐवजी केवळ ०.१ टक्का या सवलतीच्या दराने नोंदणी फी आकारण्यात येईल.

**वायदेबाजारातील व्यवहारावर सवलती (१).** १६. महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या गुंतवणूकदारांचे येथील वायदेबाजारात जे व्यवहार होतात त्यावर जे मुद्रांक शुल्क लागू होते, ते माफ करण्याचे मी प्रस्तावित करतो.

**वायदेबाजारातील व्यवहारावर सवलती (२).** १७. शेअर्स बाजारातील दलालांकडून स्वत:साठी होणाऱ्या समभागांच्या खरेदी विक्रीसंबंधीच्या दस्तांवर मुद्रांक शुल्क प्रति दहा हजार रुपयांसाठी वीस पैसे आहे. ते कमी करून दहा पैसे करण्याचे मी ठरविले आहे.

**वायदेबाजारातील व्यवहारावर सवलती (३).** १८. शासकीय तारणपत्रांची जी खरेदी विक्री होते त्या संबंधीच्या करारनाम्यावरील मुद्रांक शुल्काचा दर प्रत्येक दहा हजार रुपयांवर एक रुपया इतका होता. मागच्या वर्षी तो दर कमी करून दर एक लाख रुपयास पन्नास पैसे इतका केला. प्रिन्सिपल टू प्रिन्सिपल तत्वावर जी खरेदी विक्री होते त्या विक्री करारावरील मुद्रांक शुल्क पूर्ण माफ करायचे मी ठरविले आहे.

**वारसांच्या बे-दावा पत्रावर नाममात्र मुद्रांक शुल्क.** **१९.** एखाद्या मिळकती संबंधात किंवा इतर संबंधात आपला दावा असेल किंवा हितसंबंध असेल तर तो सोडण्यासाठी बे-दावा पत्र केले जाते. वडीलोपार्जित मिळकतीसाठी करायचे बे-दावा पत्र आणि इतर बे-दावा पत्रे यांच्यावर मुद्रांक शुल्क आकारणी एकाच दराने होते. दोन्ही प्रकारची बे-दावा पत्रे अगदीच वेगळया स्वरुपाची आहेत. म्हणून वडीलोपार्जित मिळकतीसंबंधातील बे-दावा पत्रांवर १ टक्का दराने मुद्रांक लावण्याऐवजी नाममात्र रु.२०० मुद्रांक शुल्क आकारण्याचे मी प्रस्तावित करतो.

**निर्यातदारांना सवलत.** **२०.** निर्यातीकरिता प्रक्रिया करण्यासाठी आयात करण्यात येणाऱ्या रत्ने व आभूषणे यांच्या पोचवणी आदेशांवर मुद्रांक शुल्क माफी देण्याचे मी प्रस्तावित करत आहे.

**बी ओ टी करारपत्रावर सवलतीच्या दराने आकारणी.** **२१.** सध्या अनेक प्रकल्प " बांधा, वापरा व हस्तांतरण करा " अशा माध्यमातून उभे रहात आहेत. या प्रकारातील दस्तांना मुद्रांक अधिनियमात स्वतंत्र मान्यता देणे इष्ट आहे. या दस्तांसाठी तसेच पथकरासंबंधीत दस्तांसाठी अधिनियमात एका नवीन अनुच्छेदाचा समावेश करण्याचे प्रस्तावित करीत आहे. दोन्ही प्रकारच्या दस्तांवर नवीन दर ०.१ टक्का असेल आणि कमाल देय शुल्कावर ५ लाख रुपयांची मर्यादा असेल.

**कामकाज करारपत्रावर आकारणी.** **२२.** उद्योग आणि व्यापार क्षेत्रामध्ये अनेक छोटीमोठी कामे ठेकेदारी पद्धतीने करुन घेतली जातात. ठेकेदारीच्या करारपत्रांचा स्वतंत्र उल्लेख नसल्याने या प्रकारच्या करारांना देखिल अधिनियमात स्वतंत्र मान्यता देण्याची गरज आहे. यासाठी अधिनियमात सुधारणा करुन एक नवीन अनुच्छेद दाखल करुन घेण्याचे मी प्रस्तावित करतो. शुल्क भरण्यासाठी नवीन दर ०.१ टक्का असेल आणि कमाल देय शुल्कावर ५ लाख रुपयांची मर्यादा राहील.

**प्रधान मुद्रांक कार्यालयाची पुनर्रचना.** **२३.** प्रधान मुद्रांक कार्यालयाची पुनर्रचना करण्यासंबंधीची घोषणा मागचा अर्थसंकल्प सादर करतेवेळी केली होती. नवीन व्यवस्था १ मार्च २००६ पासून अंमलात आली आहे. यामुळे अभिनिर्णय तसेच मुद्रांकांच्या परताव्याची प्रकरणे वेळच्या वेळी निकाली निघतील.

**संगणकीय प्रणालीद्वारे मुद्रांक विक्री.** **२४.** मुद्रांक तुटवड्याची परिस्थिती उद्भवू नये, तसेच बनावट मुद्रांकांना आळा बसावा यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर आता चालू करणार आहे. मुद्रांकाचा साठा, विक्री व छाननी ही कामे या प्रणालीमार्फत होतील. हे सर्व काम पाहण्यासाठी मे. स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेची शासनाने अभिकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

**इंटरनेटद्वारे दस्तऐवज नोंदणी.** **२५.** महाराष्ट्रातील प्रत्येक कार्यालयांमध्ये दस्त नोंदणीच्या कामाचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची पुढची पायरी म्हणजे इंटरनेटद्वारे दस्त नोंदणी करणे, अधिकृत नकला पुरविणे आणि नोंदणी झालेल्या कागदपत्रांची माहिती पुरविणे. ह्या सेवा पुरविण्याच्या दृष्टीने काम चालू आहे.

**विवाह नोंदणी.** **२६.** सर्वोच्च न्यायालयाने विवाह नोंदणी सक्तीची करण्यासाठी नुकत्याच सुचना दिल्या आहेत. विवाह नोंदणी प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करून नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना यात सहभागी करून घ्यायचे मी ठरविले आहे.

**अनुज्ञप्ती.** **२७.** देशी व विदेशी मद्याचे उत्पादन, साठा, खरेदी व विक्री या सर्व गोष्टींसाठी वेगवेगळया प्रकारच्या अनुज्ञप्ती लागतात. आतापर्यन्तच्या अनुभवावरून अनुज्ञप्तींच्या आशयात काही बदल करण्याचे मी ठरविले आहे. ज्या परवाना कक्षात विदेशी मद्य

सेवनाची परवानगी आहे, तेथे परवानाधारक ग्राहकांना बरोबर घेऊन जाण्यासाठी सिलबंद बाटली विकू शकेल. तसेच जेथे देशी दारु किरकोळीने विकायची परवानगी आहे, तेथे विदेशी दारु सिलबंद बाटलीतून विकण्याची परवानगी मिळेल. तसेच ज्याप्रमाणे विदेशी मद्य सेवनासाठी परवाना कक्ष असतात तसे एका नवीन अनुज्ञप्तीद्वारे देशी मद्य सेवनाकरिता परवाना कक्ष चालू करण्यासाठी परवानगी दिली जाईल. या सर्व गोष्टींसाठी अर्थातच जास्तीची फी भरावी लागेल.

**उत्पादन शुल्काच्या रचनेतील बदल.** २८. देशी व विदेशी मद्यावरील नवीन पद्धतीची कररचना १९९७ पासून अंमलात आली. मध्यंतरीच्या काळात कररचनेत काही जुजबी बदल केले होते.

देशी व विदेशी मद्य तसेच बिअर यावरील कररचनेत मी खालील महत्वाचे बदल सुचवित आहे :-

(i) देशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा किमान दर सध्या प्रत्येक प्रूफ लिटरसाठी ५० रुपये २० पैसे इतका आहे. नवीन किमान दर प्रती प्रूफ लिटरसाठी ५५ रुपये असेल.

(ii) भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर उत्पादन शुल्काचा किमान दर सध्या प्रति प्रूफ लिटरला १५० रुपये आहे. नवीन किमान दर प्रति प्रूफ लिटरला १६० रुपये असेल.

(iii) सौम्य बिअरवर उत्पादन शुल्काचा किमान दर प्रत्येक बल्क लिटरला १२ रुपये आहे. नवीन किमान दर प्रत्येक बल्क लिटरला १५ रुपये असेल.

(iv) उत्पादन शुल्क गोळा करण्याच्या सध्याच्या पद्धतीप्रमाणे निर्मिती मूल्य आणि किरकोळ विक्रीची कमाल किंमत यांच्यामध्ये

संबंध ठेवलेला असतो. सध्या जर भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याचे निर्मिती मूल्य प्रति लिटर ७२ रुपये किंवा त्याहून कमी असेल तर नागरी उपयोगासाठी किरकोळ विक्रीची कमाल किंमत ही जास्तीत जास्त म्हणजे निर्मिती मुल्याच्या चौपट असते. मी आता ठरविले आहे की भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याचे प्रति लिटर निर्मिती मुल्य ८८ रुपयांपर्यन्त असेल तर किरकोळ विक्रीची कमाल किंमत ही जास्तीत जास्त म्हणजे निर्मिती मुल्याच्या चौपट असावी. किरकोळ विक्रीची कमाल किंमत ठरविण्याचे जे सूत्र आहे त्यामध्ये या अनुरोधाने बदल करण्यात येतील तसेच कँटीन स्टोअर विभागाला जी विक्री होते त्यासाठी याच अनुरोधाने बदल करण्यात येतील.

हे सर्व बदल १५ एप्रिल २००६ पासून अंमलात येतील.

**चार चाकी खाजगी मोटार वाहनांवरील कर.**

**२९.** दुचाकी वाहनांवर महाराष्ट्र राज्यात सध्या किंमतीच्या ७ टक्के इतका मोटार वाहन कर आकारण्यात येतो. तसेच खाजगी चार चाकी वाहनांवर जानेवारी २००१ पासून किंमतीच्या ४ टक्के इतका मोटार वाहन कर आकारण्यात येतो. याच प्रकारच्या वाहनांवर शेजारील राज्यांमध्ये किंमतीच्या ५ टक्के ते ९ टक्के इतका मोटार वाहन कर आकारण्यात येतो. या सर्व बाबींचा विचार करता राज्यातील खाजगी मोटार वाहनांवरील कर ४ टक्क्याहून वाढवून ७ टक्के इतका करण्यात येईल.

**मालवाहू वाहनांवरील कर आकारणी.**

**३०.** मालवाहू मोटार वाहनांवरील कर आकारणीची पुनर्रचना १९९० मध्ये केली होती. त्यानंतर १९९७ साली किरकोळ करवाढ करण्यात आली होती. या अधिनियमामध्ये प्रत्येक प्रकारच्या मालवाहू वाहनासाठी कराची कमाल मर्यादा दर्शविली आहे. मी आता प्रस्तावित करतो की अधिनियमातील मर्यादेपर्यंत सर्व प्रकारच्या

मालवाहू मोटार वाहनांवर कर आकारावा. हलक्या मालवाहू मोटार वाहनांवर याच वाढीव दराने एकरकमी कर घेतला जाईल.

**गौण खनिजावरील स्वामित्व धन.** **३१.** गौण खनिजावरील स्वामित्व धनाच्या दरात दर तीन वर्षानंतर सुधारणा करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. माती सोडून इतर गौण खनिजावरील स्वामित्व धनाचा प्रचलित दर ५० रुपये प्रति ब्रास आहे तो वाढवून ६० रुपये प्रति ब्रास इतका करण्यात येत आहे.

**पाणीपुरवठ्याचे दर.** **३२.** राज्यातील सिंचन व बिगर सिंचन पाणी वापराच्या दरांमध्ये जुलै २००३ मध्ये सुधारणा केली होती. मध्यंतरीच्या काळात वेगवेगळया प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीवरील खर्च वाढत राहिला आहे. तसेच जुलै २००५ च्या अतिवृष्टीमुळे दुरुस्तीवरचा खर्च अनपेक्षितपणे वाढला आहे. जास्तीचा खर्च भरून काढण्यासाठी राज्यातील सिंचन व बिगर सिंचन पाणी वापराच्या दरात १५ टक्के वाढ करण्याचे मी प्रस्तावित करतो.

**केबल टी. व्ही. वरील करमणुक दर.** **३३.** केबल दूरचित्रवाणीवरील जोडण्यांवर आकारण्यात येणाऱ्या करमणूक शुल्काच्या दरात एप्रिल २००० नंतर वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे करमणूक शुल्काच्या दरात प्रत्येक क्षेत्रात ५० टक्के वाढ करण्याचे मी ठरविले आहे.

**एकत्रित परिणाम.** **३४.** माझ्या कर विषयक प्रस्तावामुळे पूर्ण वर्षात रुपये ५०० कोटी इतका अतिरिक्त महसूल जमा होईल.

**ऑक्ट्रॉय.** **३५.** राज्यातील महानगरपालिकांसाठी ऑक्ट्रॉय हे उत्पन्नाचे महत्वाचे साधन आहे. मात्र या कराच्या आकारणीस पूर्वीपासूनच विरोध आहे. ऑक्ट्रॉयच्या ऐवजी वेगळी करप्रणाली अंमलात आणण्याचा विचार अनेकवेळा झाला आहे. पण या प्रश्नाला व्यवहार्य व समर्पक उत्तर मिळालेले नाही.

समस्येवर तोडगा काढण्यासाठी एका अभ्यासगटाची स्थापना केली आहे. त्या गटाचा अहवाल मिळाला की त्यांनी सुचविलेले पर्याय चर्चेसाठी जाहिर करण्यात येतील. ऑक्ट्रॉयच्या प्रश्नावर उत्तर या वर्षात मिळणे महत्वाचे आहे.

**समारोप.** **३६.** विकासासाठी निधी पुरवितांनाच नवीन कर लावण्याच्या मर्यादा लक्षात ठेवाव्या लागतात. नवीन साधनसंपत्ती उभी करण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी मी मनापासून प्रयत्न केले आहेत. माझ्या प्रयत्नांमध्ये मला सर्वांची साथ मिळेल याची मला खात्री आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!